# “बापांची शाळा”

## मुला–मुलींच्या हक्कांसाठी पुरुषांची बाप म्हणून असणारी भूमिका

दिनांक : ६ ऑक्टोबर २०१२ वेळ: स. १०.३० ते दु. ४.००

स्थळ : सम्यक – संवाद व संसाधन केंद्र, पुणे, महाराष्ट्र

सहभागी व्यक्तींची नावे:

सतिश सिंग (सी. एच. एस. जे. दिल्ली), आनंद पवार (सम्यक, पुणे), संजय श्रीवास्तव (दिल्ली), अशोक तांगडे (सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड), सिंधू जाधव (युवा ग्राम, बीड), शहाजी गडहिरे (अस्तित्व, सांगोल), साधना दधिच (नारी समता मंच, पुणे), डॉ. शशिकांत अहंकारी (हॅलो मेडिकल फाऊंडेशन, सोलापूर), संजय सोनटक्के (ग्रामश्री, नागपूर), बळीराम जेठे (रचनात्मक, उस्मानाबाद), मीत तारा ज्ञानेश्वर (मुंबई), सुरज (सम्यक, पुणे), शक्ती जमदाडे (सी. एच. एस. जे. दिल्ली), विष्णू व्यवहारे (सी. एच. एस. जे. दिल्ली), धनंजय नंदपटेल (यवतमाळ), राम भेंडे (पुणे)

‘मुला–मुलींच्या हक्कांसाठी पुरुषांची बाप म्हणून भूमिका’ या अभियानासाठीच्या दुसऱ्या बैठकीत महाराष्ट्रातील या विषयासंबंधित काम तसेच अभ्यास करणाऱ्या लोकांनी सहभाग घेतला. बैठकीची सुरूवात मागच्या बैठकीत ठरलेल्या कामांचा आढावा घेऊन करण्यात आली. बैठकीमध्ये महाराष्ट्रातील पितृत्वाच्या संकल्पनांना समजून घेण्याची गरज आहे, तसेच कोकण, विदर्भ अशा विविध भागांचा विचार करता वेगवेगळ्या भागातून पुरूषत्वाच्या असलेल्या संकल्पनांना समजून घेण्यासंदर्भातही चर्चा झाली. सतिश ने “बापांच्या शाळा” या अभियानाअंतर्गत खालील गोष्टी महत्वाच्या आहेत असे सुचवले:

- अभियानामध्ये काम करत असताना एकत्रितपणे शिकूया आणि एकमेकांना शिकण्यास मदत करूया. प्रभावीपणे ॲडवोकसी करण्यासाठी एकत्रितपणे काम करणे खूप गरजेचे आहे

- जिथे जेंडर समानतेसाठी काम चालू आहे त्याच भागातील पुरुषांबरोबर 'बाप' म्हणून असणाऱ्या भुमिकेबद्दल काम करायचे आहे

बैठकीच्या पुढील भागात सी. एच. एस. जे. ची या अभियांनातील भूमिका स्पष्ट करण्यात आली. तसेच प्रत्येक राज्यांत या मुद्द्यावर काम करण्यासाठी संसाधन व्यक्तींचा एक गट असावा याची गरज व्यक्त करण्यात आली. त्याप्रमाणे देश पातळीवर असे काम करणाऱ्या आणि या अभियानाशी जोडल्या गेलेल्या प्रशिक्षकांबरोबर एक प्रशिक्षण आयोजित केल्याचे सांगितले गेले. तसेच वर्षातून एकदा १० ते १५ दिवसांचे अभियान संस्थांनी आपापल्या कार्यक्षेत्रात करण्याचे ठरवण्यात आले. या अभियानांतर्गत बापांबद्दलच्या कथांचे संकलन करणे, त्या कथांची राष्ट्रीय स्तरावर विविध व्यासपीठावर मांडणी केली जावी आणि SMS चा वापर करणे, चित्रफिती तयार करणे अशा नवनवीन पद्धतीने त्याचा प्रचार, प्रसार केला जावा असे ठरवण्यात आले.

याच बरोबर खालील मुद्द्यांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली आणि त्यासंदर्भात काही निर्णयही घेण्यात आले. चर्चा व निर्णय खालीलप्रमाणे:

- एकत्रित केलेले लेख किंवा कथा या आपल्यासाठीचे वाचनाचे साहित्य असेल, सहभागी संस्थांकडे त्याची प्रत असेल. रमाकांत राय यांचा लेख मराठीत करण्याचेही ठरवण्यात आले
- संयुक्त राष्ट्र संघाच्या बालहक्काच्या करारनाम्या आधी मुला–मुलींच्या हक्कांसंदर्भातील आणि त्यामध्ये असणारी बापांची भूमिका काय होती याचा ऐतिहासिक आढावा घेणे तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या बालहक्काचा करारनामा च्या संदर्भात (Contextualizing) महाराष्ट्रातील काय परिस्थिती आहे हे पाहणे
- या अभियानांतर्गत काय रचना असावी याची चर्चा करण्यात आली त्यानुसार "बापांची शाळा" या अभियानाच्या विचारधारेशी जोडून काम करणारी व्यक्ती सम्यक ने नियुक्त करावी
- महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या लोकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील शिक्षक–पालक सभेतील तसेच वैयक्तिक पातळीवरील अनुभव सांगितले. तसेच महाराष्ट्रातील काही भागात बापांचा मित्र गट स्थापन स्थापन केला गेला आहे आणि काही ठिकाणी बापांबरोबर संवादाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे याबद्दलचे अनुभवही बैठकीत मांडण्यात आले
- महाराष्ट्रामध्ये महिलांचे हक्क, बाल हक्क तसेच लिंगभाव समानतेला घेऊन काय मुद्दे आहेत याची पुढील काळात माहिती घेण्यात यावी

- हे अभियान प्रकल्पासारखं नसणार आहे तर बापांच्या या बदलत्या भूमिकांमधून आपण पितृसत्तेला धक्का देण्याचं काम करणे हा हेतू या अभियानाचा असेल तसेच यासाठी कार्यक्रमांच्या पातळीवरती लवचिकता असणार आहे. या अभियानामध्ये प्रक्रिया आधारीत काम असेल
- उपलब्ध असणाऱ्या आर्थिक तसेच मानवी संसाधनांच्या बाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली
- सहभागी संस्था/व्यक्ती ठरवण्यात आल्या. त्यानुसार सम्यक "बापांची शाळा" या अभियानासाठी महाराष्ट्रातील समन्वयक संस्था म्हणून काम पाहील. निर्णय घेणारी प्रमुख समिती म्हणून आनंद पवार (सम्यक, पुणे), साधना दधिच (नारी समता मंच, पुणे), डॉ. शशिकांत अहंकारी (हॅलो मेडिकल फाऊंडेशन, सोलापूर) संजय सोनटक्के (ग्रामश्री, नागपूर) हे काम पाहतील
- या अभियानाचे नाव "बापांची शाळा" राहू द्यावे असे ठरवण्यात आले तसेच आपापल्या कार्यक्षेत्रात "बापाची शाळा" सुरू करावी
- मुला–मुलींना त्यांचा बाप कसा हवा? ह्याबद्दल एक छोटे सर्वेक्षण केले जाईल
- ह्या चर्चेसाठी जमलेल्या गटाचीपण बाप म्हणून समज वाढवण्याची गरज लक्षात घेता 'बापाची शाळा' चालू करावी आणि दोन वक्त्यांना आमंत्रित करून बाप, पालकत्व या विषयांवरती एक–एक तासांचं व्याख्यान ठेवाव
- १४ नोव्हेंबर हा दिवस भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी लहान मुलांच्या हक्कांसाठी "बापांची शाळा" आपापल्या कार्यक्षेत्रात सुरू करावी.
- 'लहान मुला–मुलींनी आपापल्या वडिलांना पत्र लिहावे' अशी एक पद्धत अभियानासाठी सुचवण्यात आली
- १० दिवसांचे "बापांची शाळा" अभियान आपापल्या कार्यक्षेत्रात ४ ते १३ जानेवारी २०१३ राबवण्याचे ठरवण्यात आले, त्यासाठीची नियोजनासाठीची बैठक ही डिसेंबर २०१२ मध्ये घेण्यात येईल
- राज्य पातळीवरील क्षमता वृद्धी प्रशिक्षणाची तारीख १९, २० आणि २१ नोव्हे. २०१२ राहील असे ठरवण्यात आले
- २७, २८ आणि २९ ऑक्टो. २०१२ ला दिल्ली मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील क्षमता वृद्धी प्रशिक्षणात महाराष्ट्रातून मीत तारा ज्ञानेश्वर (मुंबई), अशोक तांगडे (सावित्रीबाई फुले

महिला मंडळ, बीड), एच. पी. देशमुख (युवा ग्राम, बीड), शहाजी गडहिरे (अस्तित्व, सांगोल), विकास सुरवसे (हॅलो मेडिकल फाऊंडेशन, सोलापूर), संजय सोनटक्के (ग्रामश्री, नागपूर), बळीराम जेठे (रचनात्मक, उस्मानाबाद), सुरज (सम्यक, पुणे) जाण्याचे ठरवण्यात आले

- दोन वर्षानंतर आपण या अभियानाला कशा पद्धतीने बघत आहोत याबद्दल प्रत्येकाने लिहावं, अशी एक कृती सर्वांनी केली. या कृतीनंतर सहभागींची उत्तरे खालीलप्रमाणे:

<u>आनंद पवार:</u>

- दोन वर्षानंतर जबाबदारी आणि काळजी या एकमेकांपासून वेगळ्या गोष्टी आहेत याबद्दल अभियानांतर्गत लिखाण केले जाईल
- बापांबरोबरच्या नात्यांबद्दल असणाऱ्या लेखांचे एकत्रीकरण तर सुरूच आहे आणि हा लेखांचा संच सहभागी संस्था व व्यक्तिंकडे उपलब्ध असेल
- या दोन वर्षांत पुरुषांच्या गटांबरोबर बोलून ‘बाप आणि त्यांचे मुलं–मुली एकत्र येऊन काय करू शकतात?’ यासाठी विविध पद्धती विकसित झालेल्या असतील
  उदा: सम्यक आपल्या कार्यक्षेत्रात दूध सहकारी संघात असणाऱ्या बापांबरोबर अशा पद्धती विकसित करण्याचा प्रयत्न करेल

<u>साधना दधिच:</u>

- कुणालाही काळजी नसते की मुला–मुलींना काय पाहिजे आहे? नारी समता मंच ज्या भागात काम करते त्या भागात करीअरला घेऊन खूप मुद्दे आहेत, त्या ठिकाणी बाप आणि मुला–मुलींमध्ये संवाद सुरू करायला आवडेल
- छेडछाड संबंधी मुलं–मुली आणि बापांमध्ये संवाद सुरू व्हायला हवा
- ‘काळजी करणे’ ही संकल्पना या दोन वर्षाच्या अंती स्पष्ट झालेली असेल तसेच बाप आपल्या मुला–मुलींबद्दल काळजी करायला सुरूवात झालेली असेल
- मुलं–मुलीही आई वडिलांच्या ‘काळजी’ समजतात का? याचा शोध घेतलेला असेल

बळीराम जेठे:

- बाप आपल्या मुला–मुलींना मारणार नाही
- घरच्या निर्णय प्रक्रियेमध्ये मुलं–मुली असतील
- पालक आपले म्हणणे मुला–मुलींवर लादणार नाहीत

डॉ. शशिकांत अहंकारी:

- मुला–मुलींच्या आरोग्याच्या संदर्भात बापाचा सहभाग असेल
- सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत पालक आणि मुला–मुलींमधील संवाद वाढलेला असेल
- आपापल्या नात्यातच (मामाचा मुलगा, आत्याची मुलगी इ.) विवाह करण्यासाठी पालकांचा दबाव नसेल
- मुला–मुलींच्या भविष्याबाबत निर्णय घेण्यात बापाची भूमिका असेल
- पालक आणि मुला–मुलींमध्ये लैंगिक व प्रजनन आरोग्यासंदर्भात संवादासाठी विश्वास तसेच स्पेस निर्माण झालेली असेल
- मुलांच्या व्यसनांसंदर्भात चर्चा करण्यासाठी स्पेस असेल
- कार्यक्षेत्रात आधीच तयार असलेले गट बापांबद्दलचे अनुभव सांगण्यासाठी तयार झालेले असतील तसेच दबाव गट म्हणून कार्यरत झालेले असतील
- बापांबद्दलची बदलणारी भूमिकाचा प्रचार / प्रसार करण्यासाठी गावात एकमेकांना सहकार्य करण्यासाठी गट तयार असतील
- एकदा तरी बापांच्या काळजी करणाऱ्या भूमिकेबद्दल सी. एच. एस. जे. च्या प्रत्येक न्यूज लेटर मध्ये एक कथा असेल

अशोक तांगडे:

- कमीत कमी १० बापांचा सहभाग असलेला गट १० गावात असेल आणि त्यांची शाळा सुरू झालेली असेल

- बापांमधील आणि मुला–मुलींमधील संवाद वाढलेला असेल तसेच पाल्य आपापल्या पालकांजवळ आपल्या भावना खुलेपणाने व्यक्त करू शकतील
- मुला–मुलींचा कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सहभाग असेल
- लहान मुलांनाही 'कळतं' या भूमिकेला समाजात मान्यता असेल
- दोन वर्षानंतर बापांच्या शाळेचे विद्यार्थी आणि बापांच्या शाळेत न आलेले बाप यांच्यात तुलनात्मक आढावा घेतला जाईल

संजय सोनटक्के:

- बाप संवेदनशील झालेले असतील
- एका शाळेत प्रत्येक महिन्याला पालकांबरोबर या मुद्द्यांची चर्चा होईल, २ वर्षांत २४ बैठका घेतल्या जातील
- संवेदनशील बापांना आपल्या भावना, अनुभव सांगण्यासाठी/व्यक्त होण्यासाठी स्पेस असेल
- मुलं–मुली आणि बाप एकत्र येऊन खेळू शकतील असे काही खेळ विकसित झालेले असतील तसेच विविध विषयांवरती चर्चा करण्यासाठी स्पेस असेल
- बापांमध्ये तार्किक पद्धतीने विचार करून निर्णय घेण्याची सुरूवात झालेली असेल
- २ वर्षांनी बापांचे संमेलन आयोजित केले जाईल आणि आनंद जाहीर केला जाईल

शहाजी गडहिरे:

- निर्णय प्रक्रियेत मुला–मुलींचा सहभाग असेल
- बापांचा एक गट असेल जो बाल–विवाहाला विरोध करेल आणि तो थांबवण्यासाठी सक्रिय असेल

<u>राम भेंडे:</u>

- विविध विषयांवरती पालक आणि मुला–मुलींमध्ये चर्चा होईल
- या मुद्द्याला घेऊन १०००० मुला–मुलांचे आम्ही प्रशिक्षण केलेले असेल

<u>मीत तारा ज्ञानेश्वर:</u>

- Narrative Therapy साठी लहान मुलांचा आधार गट असेल
- शहरांमध्ये मुलं–मुली आणि त्यांच्या बापांमध्ये खूप व्यावहारिक नातं असतं या नात्यांचं स्वरूप बदललेलं असेल
- मुलं–मुली आणि त्यांचे पालक यांच्यासाठी स्वयंसहायता गट असेल
- वडिल बनणे ते वडिलपणाच्या जबाबदारीची प्रक्रिया सुरू होणे या प्रवासाचा आनंद साजरा केला जाईल
- पालकत्वाच्या कार्यक्रमाचा संबंध वडिलपणाची जबाबदारी स्विकारण्यासंदर्भात कसा लागू होतो हे पाहिले जाईल
- मुली मुलांना प्रश्न विचारू शकतील की, “तू माझ्या बाळाचा ‘असा’ बाप होणार का?”
- दारू पिणाऱ्या व्यक्तींना निनावी ठेवून जशी मदत केली जाते, त्याच प्रकारे बापांना निनावी ठेवून त्यांना मदत करणारी, त्यांचे अनुभव ऐकून घेणारी एक स्पेस असावी
- वैवाहीक समुपदेशन मध्ये पुरूषांची बाप म्हणून काय भूमिका असते याची सुरूवात केली जावी
- समलैंगिक मुलगा/मुलगी यांचं आपल्या बापांशी असलेले नातं बहुतेक वेळेला कमकुवत असतं, त्याची माहिती २ वर्षानंतर आपल्याला असेल
- आर्मी मध्ये काम करणाऱ्या बापांचं त्यांच्या मुला–मुलींशी असलेले नातं शोध घेऊन तपासलं जावं
- बाप आणि त्यांच्या मुला–मुलींसाठी ‘मस्ती’ सेंटर्स असावीत
- कौटुंबिक निर्णयापेक्षा आधी मुलं–मुली स्वतःचे तरी निर्णय घेऊ शकले पाहिजेत
- बाप आणि त्यांच्या मुला–मुली मध्ये ‘जादूकी झप्पी’ असावी

<u>सिंधू जाधवः</u>

- बाप कामांमध्ये खूप जास्त व्यस्त असतात, ही परिस्थिती बदलून बापांचे मुला–बाळांकडे लक्ष वाढलेले असेल
- बाप आणि त्यांच्या मुला–मुलींच्या नात्यातील भिती कमी झालेली असेल
- मुलं–मुली स्वतःचे निर्णय स्वतः घेतील

<u>सतीश सिंगः</u>

- राज्य स्तरावर पुरूषांबरोबर काम करणारा एक संसाधन गट असेल, जो इतर ठिकाणीही हा मुद्दा घेऊन प्रशिक्षणासाठी जाऊ शकेल
- पुरूष लहान मुलांच्या हक्कांसाठी आवाज उठवत असतील
- काळजी घेणाऱ्या बापांची प्रतिमा दृश्य असतील

<u>संजय श्रीवास्तवः</u>

- ज्या बापांनी आपल्या मुलींना कुठपर्यंत सूट दिलेली आहे, अशा बापांचे काय ताण–तणाव आहेत, त्यांचा गट असावा आणि त्या बापांनी परिस्थितीशी कसं जुळवून घेतलं काय मुद्द्यांवर मात केली असे मुद्दे समजून घ्यावे
- अशा वेगवेगळ्या गटांनी एकमेकांबरोबर आपले अनुभव शेअर करावेत
- स्वतः मध्ये काळजीशी संबंधीत झालेले बदल हे स्वतः केलेले आहेत का करावे लागले यासंदर्भात माहिती संकलीत झालेली असावी